पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, स्थापत्य मुख्यालय
क्र.स्था/लेखा/३/कावि/ ९२२/२०१६
दिं. ५ /१२/२०१६

विषय – विकास कामांची बिले अदायगीबाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत प्रतिवर्षी विविध विकास कामांच्या निविदा प्रसिध्द करून अशी कामे ठेकेदारामार्फत करून घेतली जातात. ठेकेदारांनी केलेल्या कामांचे बील तयार करणेपुर्वी उपअभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी खालीलबाबींची पुर्तता करून बीले अदा करणेसाठी स्थापत्य लेखा विभागात पाठवणे आवश्यक आहे.

१) प्रत्येक बीलासोबत ठेकेदारांनी त्या कामावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची यादी व त्यांचे पी.एफ. भरणा केल्याची चलने नस्तीत समाविष्ठ केल्या नंतरच उपअभियंता यांनी बील अदायगीची शिफारस करावी. पीएफचा भरणा केला नसल्यास अशी बीले अदायगीसाठी पाठवू नयेत.

२) कामाचा व कामगारांचा विमा (पॉलिसी प्रत) बील नस्तीत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

३) बीले (Arathmatical) तपासणीस देणेपुर्वी स्थळ प्रतीवर कनिष्ठ व उपअभियंता यांनी स्वाक्ष-या करणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक बीला सोबत एस.जी.एस. / आय.आर.एस. यांचे (Activiti Report) रिपोर्ट जोडणे आवश्यक आहे.

५) आर.ए. बीलासोबत IR असल्यास तो तांत्रीक कक्षाकडून तपासणी करून घेणे आश्यक आहे.

६) बील नस्तीमध्ये मा.स्थायी समिती मंजूर ठरावाची प्रत दाखल करून मा.स्थायी समितीने मंजूर केलेल्या खर्चाचे मर्यादे पर्यंतच बील अदायगीची शिफारस करावी.

७) मोजमाप पुस्तकात कामाचे मोजमाप नमुद करताना ठेकेदाराने प्रत्येक्ष काम केलेला दिनांक नमुद करणे अत्यावश्यक आहे.

८) ठेकेदारांनी प्रत्येक्ष काम करताना साईट वर खरेदी केलेल्या मालाची बीले / चलने नस्तीत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

९) मोजमाप पुस्तकातील नोंदी सुवाच्छ व नीटनेटक्या घेवून खडाखोड / ओव्हर राईटींग करू नये. अन्यथा अशा नोंदीच्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता यांनी स्वाक्षरी करावी.

१०) मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.आक/कावि/१७४/२०१६ दि.११/११/२०१६ नुसार कामाचे मुदतवाढी बाबत पुर्तता करून बील तपासणीसाठी शिफारस करावी.

११) अंदाजपत्रकात कामासाठी केलेल्या तरतुदीच्या मर्यादितच बील अदायगीची शिफारस करावी.

१२) ठेकेदारांची अंतीम बीले / भाववाढ बीले तांत्रीक कक्षाकडून तपासणी झाल्यानंतरच बील अदायगीसाठी पाठविण्यात यावी.

वरील सर्व मुद्दयांची काटेकोरपणे अमंलबजावणी करून कनिष्ठ / उपअभियंता यांनी ठेकेदारांनी केलेल्या विकास कामांची बिले स्थापत्य लेखा कक्षाकडे पाठवावी. सदर परिपत्रकातील मुद्दयांचे पुर्तता न करता बीले पाठविल्यास ती

स्विकारली जाणार नाहीत. तसेच याबाबत संबंधीतांवर व्यक्तीशा: जबाबदार निश्चित करून शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करावी लागेल. याची गंभीर नोंद घ्यावी.

शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

प्रत –१) सर्व कार्यकारी अभियंता
परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून बील अदायगी मंजूर करावेत.

२) लेखा विभाग/ पीएफ भरणा चलने बील नस्तीत उपलब्ध नसल्यास बीले मंजूर करू नयेत.

३) तांत्रीक तपासणी कक्ष – बीले तांत्रीक कक्षाकडे प्राप्त झाल्यानंतर परपित्रकातील सर्व मुद्दयांचे काटेकोरपणे पालन करून बील अदायगीची शिफारस करावी.

४) स्थापत्य लेखा विभाग